मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 24 डिसेंबर 2024 | पान- 1

# पर्यावरणाच्या बचावासाठी महापालिकेकडून स्वतंत्र एजन्सीची नेमणूक...

**कारवाईचेही एजन्सीला अधिकार.. : महापालिका पर्यावरण विभागाच्या वतीने विशेष कार्यवाही हाती घेतली आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिपरी-चिंचवड शहराताल हवेची गुणवत्ता नियंत्रणात ठेवण्यासाठी त्याचबरोबर नागरीकांचे उत्तम आरोग्य टिकवण्यासाठी महापालिका पर्यावरण विभागाच्या वतीने विशेष कार्यवाही हाती घेतली आहे. घनकचरा, राडारोडा, प्लॅस्टिक, जैववैद्यकीय अशा स्वरुपातील कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. ही कार्यवाही करण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र एजन्सी नेमली आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात वाढणारे प्रदूषण व त्या अनुषंगाने करावयाच्या उपायोजना व मार्गदर्शन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रसिद्ध केले आहे. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेने १८/०९/२०२४ जीआरच्या आदेशान्वये ग्राफ तयार केला असून त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

पिंपरी- चिंचवड शहरातील हवेची गुणवत्ता नियंत्रणात ठेवणे व नागरीकांच्या उत्तम आरोग्य पुरविण्याकरीता महापालिकेने कार्यवाही हाती घेतली आहे. त्यानुसार शहरात घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६, बांधकाम राडारोडा व्यवस्थापन अधिनियम २०१६, प्लॅस्टिक अधिनियम २०१६, जैववैद्यकीय घनकचरा अधिनियम, पर्यावरण संवर्धन अधिनियम १९८६ इत्यादीनुसार शहरातील सार्वजनिक ठिकाणांवर देखरेख करण्यात येणार आहे. त्याकरीता मनपामार्फत स्वतंत्र एजन्सीची नेमणूक करण्यात आलेली आहे.

## नदीपात्रावरही लक्ष...

» महापालिका हद्दीत स्थानिक नागरिकांकडून तसेच अज्ञातांकडून रस्त्याच्या कडेने नदी नाले यांच्या काठावर अनाधिकृतपणे भराव घनकचरा सार्वजनिक ठिकाणी फेकणे, परिसर अस्वच्छ ठेवणे, रस्ते-पदपथावर घाण करणे, चालू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी बांधकाम नियंत्रण नियमावलींचे उल्लंघन केले जाते. तसेच, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, लघुशंका करणे, सार्वजनिक सभा समारंभ संपल्यावर साफसफाई न करणे, मनपा सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण करणे असे प्रकार केले जातात. व्यावसायिक आस्थापनेमार्फत कचरापेटी ठेवली जात नाही. जैव वैद्यकीय घनकचरा रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी फेकला जातो. कचरा जाळणे, बंदी असलेल्या प्लॅस्टिकचा वापर करणे, मोकळ्या प्लॉटमध्ये अस्वच्छता ठेवणे असे प्रकार आढळून येतात. याशिवाय, डास उत्पत्ती स्थानाची निर्मिती करणे तसेच लहान उद्योजक कारखानदार मार्फत सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नाल्याद्वारे नदीमध्ये सोडणे अशा कृत्यामुळे पर्यावरणाचा -हास होत आहे. अशा प्रकरणी दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

# पिंपरी चिंचवड शहरातील अनेक युवा कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**खासदार बारणे यांनी मनगटावर शिवबंधन बांधून सर्वांचे पक्षात स्वागत केले.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक युवा कार्यकर्त्यांनी शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. खासदार बारणे यांनी मनगटावर शिवबंधन बांधून सर्वांचे पक्षात स्वागत केले.



थेरगाव येथे झालेल्या पक्ष प्रवेशावेळी युवासेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे, शिवसेना जिल्हा प्रमुख निलेश तरस, युवासेना जिल्हाप्रमुख राजेंद्र तरस, रूपेश कदम, सागर पाचार्णे यावेळी उपस्थित होते. करण नागणे, सूरज पोइंड, चैतेश पाहिल, विक्रम कट्ठे, आदेश खाडे, सौरभ सावंत, प्रणव वाहा, कृष्णा राठोड, अणुज घणोरकर, शिवतेज कोडेकर, तेजस राऊत, अभय राऊत, हर्षल म्हस्के, अनिकेत बोडेकर कुणाल घणोरकर, प्रथमेश रनवरे, हर्ष गिरमे, किरण गंगुरडे, समीर महानगडे, संकेत पवार, अथर्व ननवरे, हिमांक शास्वि, अभिजित घोमसे, सोमनाथ भांगे, रोहित जोशी, इमाद राजपकर, अनुराग मांटे, निरज बागवे, यश खरपोडे, शिवम चोरंगे, सागर काकडे, अमोल नाईक या युवकांनी शिवसेनेत प्रवेश केला.

युवा कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेची ताकद वाढली आहे. शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे. शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्याने प्रेरीत होऊन अनेक कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत आहेत. प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचा योग्य मान सन्मान राखला जाईल. कार्यकर्त्यांनी आगामी महापालिका निवडणुकीच्या तयारीला लागावे अशा सूचना खासदार बारणे यांनी केल्या.

# पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयात 'सेलेस्टियल नाईट'चे यशस्वी आयोजन

**पुणे रेल्वे विभाग व एनडीआरएफचा संयुक्त उपक्रम**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पीसीईटीच्या पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकतेच ‘सेलेस्टियल नाईट’ या खगोलशास्त्रीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. टीम अनंतम या महाविद्यालयाच्या रॉकेट्री आणि स्पेस रिसर्च टीम तर्फे आयोजित या कार्यक्रमाचे नेतृत्व कार्यकारी संचालक पार्थ बिरवटकर आणि व्यवस्थापकीय संचालक अथर्व शितोळे यांनी केले.



या कार्यक्रमाला ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दोन दुर्बिणींच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी शुक्र, गुरू व त्याचे चार चंद्र, शनी व त्याच्या कड्या, तसेच चंद्राचे अविस्मरणीय दर्शन घेतले.

विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राचा अनुभव देण्यासाठी आणि अवकाश विज्ञानाची गोडी लागावी या उद्देशाने ‘सेलेस्टियल नाईट’ सारख्या कार्यक्रमांचे आयोजन भविष्यातही करण्यात येणार आहे अशी माहिती टीम अनंतमने दिली. टीम अनंतम ही महाविद्यालयातील एक नवी रॉकेट्री आणि स्पेस रिसर्च टीम असून, ती अवकाश विज्ञानाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत आहे. या टीमला डॉ. केतन देसले यांनी मार्गदर्शन केले.

पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यार्थी आणि इतर सहभागींचे या स्वागत केले. टीम अनंतम या महाविद्यालयाच्या रॉकेट्री आणि स्पेस रिसर्च टीम तर्फे आयोजित या कार्यक्रमाचे नेतृत्व कार्यकारी संचालक पार्थ बिरवटकर आणि व्यवस्थापकीय संचालक अथर्व शितोळे यांनी केले.

# तीनच महिन्यात महापालिका निवडणूकीचा बिगुल वाजणार?...

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या तीन महिन्यांत घेण्यासाठी महायुतीचे सरकार प्रयत्नशील असल्याचे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभेच्या निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळवल्यानंतर भाजपने आता स्वराज्य संस्थांच्या स्थानिक निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या पावणेतीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या तीन महिन्यांत घेण्यासाठी महायुतीचे सरकार प्रयत्नशील असल्याचे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केले.

नवनियुक्त मंत्री आणि आमदार यांच्या उपस्थितीत नागपुरात आयोजित कार्यकर्त्यांच्या सदस्य नोंदणी प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर येत्या चार जानेवारी रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांचे वक्तव्य चर्चेत आले आहे. मुख्य म्हणजे राज्यातील सर्वच प्रमुख पक्षांनी काही महिन्यांपासून या निवडणुकांची तयारी सुरू केली आहे.

फडणवीस म्हणाले, विधानसभेला मिळालेल्या दणदणीत विजयामुळे भाजप कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. सध्याचे वातावरण भाजपसाठी अत्यंत अनुकूल आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मोठा विजय मिळवण्याचे लक्ष्य पक्षाने ठेवले आहे. त्यासाठी नियोजन सुरू करण्यात आले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मोठा विजय मिळवायचा असेल तर सदस्यत्व नोंदणीवर भर द्यावाच लागेल, असेही ते म्हणाले.

प्रभाग रचना, किती नगरसेवकांचा प्रभाग, राखीव जागांसाठीच्या जनगणनेचा अभाव यासंबंधी न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर खुद्द न्यायालयानेही जनगणनेबाबत आकडेवारीच नाही, तर मग राखीव प्रभाग निश्चित कसे करायचे, असा प्रश्न उपस्थित केला आहे. अशा अनेक कारणांनी राज्यात केवळ महानगरपालिकाच नव्हे तर नगरपालिका, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती यांच्या निवडणुका मागील पावणेतीन वर्षांपासून रखडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर गेल्या पावणेतीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या तीन महिन्यांत घेण्यासाठी महायुतीचे सरकार प्रयत्नशील असल्याचे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



### 'या' जिल्हा परिषदांच्या निवडणुका प्रलंबित

» रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, धाराशिव, लातूर, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा.

### 'या' महापालिकांच्या निवडणुका प्रलंबित

» पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण – डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, मीरा-भाईंदर, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मालेगाव, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, छ. संभाजीनगर, नदिड, लातूर, परभणी.

# शैक्षणिक बदलांची माहिती आता शाळेतच

## राज्यात "स्कूल कनेक्ट' अभियानाची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शैक्षणिक बदलांची माहिती विद्यार्थ्यांना शाळेतच उपलब्ध होणार आहे. या साठी सर्व अकृषि विद्यापीठ स्तरावरुन "स्कूल कनेक्ट' अभियानाची व्याप्ती वाढवली जाणार आहे. यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पुढाकार घेतला आहे. यंदा दि. १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत विविध उपक्रमांच्या माध्यमातून ही माहिती दिली जाणार आहे.

यंदा या उपक्रमात इयत्ता नववी, दहावी आणि अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांत ही माहिती दिली जाणार आहे. यात प्रामुख्याने व्याख्याने, प्रशिक्षण शिबिरे यांसह ऑनलाइन माध्यमातूनही माहिती पुरवली जाणार आहे. यासाठी विद्यापीठांतील तज्ज्ञ मंडळी शाळांना भेटी देतील आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.

गेल्या वर्षी हा उपक्रम फक्त इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी राबवला गेला होता. यंदा त्यांची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. या उपक्रमाचा फायदा विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी होणार आहे. हा उपक्रम विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.



### अभियानाची उद्दिष्टे

» विद्यार्थ्यांना बारावीनंतर त्यांच्या आवडीचे अभ्यासक्रम निवडण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे
» दहावीनंतर विद्यार्थ्यांना रोजगारक्षम अभ्यासक्रम निवडायचा असेल त्यांना त्यासाठी उपलब्ध संधी आणि पुढे पदवी अभ्यासक्रमात उपलब्ध संधीची माहिती करुन देणे
» प्रत्येक विद्यार्थी उच्च शिक्षणाकडे वाटचाल करेल, यासाठी मार्गदर्शन करणे.
» नावीन्यपूर्ण बदलाविषयी विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करणे
» विद्यापीठांनी तयार केलेल्या नव्या अभ्यासक्रमाविषयी सविस्तर माहिती उपलब्ध करून देणे
» नव्या पद्धतीचे मूल्यांकन, ग्रेडिंग पद्धत याची माहिती पुरविणे
» शिष्यवृत्तीविषयी सविस्तर माहिती देणे

# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाईंडला सोडणार नाही

## उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिला इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाईंड कोणीही असला तरी त्याला सोडणार नाही असा इशारा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला आहे. यासाठी वाटेल ती किंमत मोजावी लागली तरी चालेल असे देखील ते म्हणाले आहेत. बारामतीतील नागरी सत्कारात बोलताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड येथील संतोष देशमुख हत्या प्रकरणाकडे लक्ष वेधले. यावेळी खासदार सुनेत्रा पवार तसेच आमदार अमोल मिटकरी उपस्थित होते.

बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण हे माणुसकीला काळीमा फासणारी घटना आहे. संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे पडसाद उमटले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात याबाबत उत्तरे दिले आहेत. याबाबत कडक कारवाईचे आदेश देखील देण्यात आले आहेत. शाहू फुले आंबेडकरांच्या महाराष्ट्रात अशा घटना खपवून घेतल्या जाणार नाहीत.

बीड मधील या घटनेमुळे आमची देखील शरमेने मान खाली गेली आहे. फाशीची शिक्षा झाल्याशिवाय आरोपींना सोडायचं नाही. जेणेकरून अशा घटनांची पुनरावृत्ती किंवा कोणाचे धाडस होणार नाही. याबाबत न्यायालयीन चौकशी देखील केली जाईल तसेच वेळ पडल्यास फास्टट्रॅक कोर्टातही प्रकरण चालवले जाईल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

राज्यमंत्री मंडळाच्या विस्तार बाबत अजित पवार यांनी भाष्य केले. यंदाच्या मंत्रिमंडळात मंत्र्यांची संख्या वाढली आहे. काहींना संधी देऊ शकलो नाही. त्यांनी नाराज होऊ नये अथवा गैरसमज देखील करून घेऊ नये. आगामी काळात त्यांना संधी देण्याचा प्रयत्न केला जाईल. केंद्रीय मंत्रिमंडळात किंवा इतर ठिकाणी देखील संधी दिली जाईल. कोणी वेगळ्या प्रकारची वक्तव्य करू नयेत अशा सूचना देखील अजित पवार यांनी यावेळी केल्या.



# पाणीपुरवठ्यासाठी बीआरटीतून टाकणार जलवाहिनी

## निगडी ते दापोडी मार्गावर सुरु होणार काम : वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

दापोडी, सांगवीसह पुणे-मुंबई मार्गावर दोन्ही बाजूने निर्माण होणाऱ्या इमारतींना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होण्यासाठी शहरातील सर्वात जास्त रहदारीचा मार्ग असलेल्या निगडी ते दापोडी मार्गावर महापालिकेच्या वतीने बीआरटी मार्गातून नव्याने स्वतंत्रपणे जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. या मार्गावर यापूर्वीच मेट्रो, अर्बन स्ट्रीटची कामे सुरू असताना आता जलवाहिनीच्याही कामाची भर पडणार असल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या पुढे गेली आहे. पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत असल्याने पवना धरणाचे ५१० एमएलडी, आंद्रा धरणाचे ८० एमएलडी आणि एमआयडीसीचे २० एमएलडी असे एकूण मिळणारे ६१० एमएलडी पाणी सद्यपरिस्थितीत शहराला कमी पडत आहे. पुण्याच्या दिशेला शहराचे टोक असलेल्या दापोडी, फुगेवाडी, सांगवी या भागांत तसेच, पुणे-मुंबई जुन्या महामार्गावरील नवीन गृहप्रकल्पांना पुरेसे पाणी मिळावे, म्हणून महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून निगडी ते दापोडी ही जलवाहिनी टाकण्यात येणार आहे.

निगडीच्या सेक्टर क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रापासून ते दापोडीपर्यंत बीआरटी मार्गातून भूमिगत जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेच्या वतीने निविदा प्रक्रिया राबवण्यात आली होती. या कामासाठी आठ ठेकेदारांनी निविदा भरल्या. त्यातील गुडविल कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराची ९.३६ टक्के कमी दराची ५२ कोटी ४२ लाख रुपये खर्चाची निविदा स्वीकृत करून या ठेकेदाराला जलवाहिनीचे काम दिले आहे. या कामाची मुदत दोन वर्षे आहे.

निगडी ते दापोडी मार्गाच्या सर्व्हिस रस्त्यावर दोन्ही बाजूने महापालिकेच्यावतीने अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार सुशोभीकरणाचे काम हाती घेतले आहे. पहिल्या टप्प्यात पिंपरी ते चिंचवड दरम्यान कामाला सुरूवात झाली आहे. रस्त्यांची रुंदी कमी करून पदपथ व सायकल ट्रॅक बांधण्यात येत. तसेच स्ट्रीट लाईटही उभारण्यात येत आहे. त्यामुळे हा मार्ग आधीच अरूंद झाला आहे. त्यानंतर आता निगडीतील भक्ती-शक्ती समूहशिल्प उद्यानाच्या बाजूच्या सर्व्हिस रस्त्यावरून बीआरटी मार्गातून दापोडीपर्यंत भूमिगत जलवाहिनी टाकण्यात येणार आहे.

### जलवाहिनीमुळे पाण्याची समस्या सुटेल

शहरात दापोडी ते मोरवाडीपर्यंत मेट्रो धावत आहे. या मेट्रो मार्गामुळे एफएसआय वाढल्याने पुणे-मुंबई महामार्गावरील दोन्ही बाजूने टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. या शेकडो निवासी इमारतींना या जलवाहिनीतून पाणी दिले जाणार आहे. त्यामुळे नव्याने तयार झालेल्या इमारतींना पाण्याची समस्या भेडसावणार नाही, असा दावा पाणीपुरवठा विभागाचा आहे.

### बीआरटी मार्ग अडथळ्यांची शर्यत

» निगडी ते दापोडी या दरम्यान दोन्ही बाजूने बीआरटी सुरू आहे. बीआरटी मार्गासाठी महापालिकेने कोट्यवधी रूपयांचा खर्च केला आहे. मेट्रोच्या कामामुळे हा मार्ग बंद पडतो की काय, अशी शंका वाटत आहे. दुसरीकडे निगडी भक्ती-शक्ती ते मोराडी मार्गावर मेट्रोचे काम सुरू आहे. त्यामुळे पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावर अनेक ठिकाणी बीआरटी मार्गात मोठे अडथळे निर्माण होत आहेत. मेट्रो, अर्बन स्ट्रीट आणि आता जलवाहिनीच्या कामामुळे सर्व्हिस रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.

# आता अतिरिक्त आयुक्तांनाही परवान्याचे अधिकार

## पंडितप्रवर गणेश्वरशास्त्री द्राविड यांच्या शुभेहस्ते ज्येष्ठ शास्त्रज डॉ. रघुनाथ माशेलकर यांना पुरस्कार प्रदान

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील (पीएमआरडीए) कार्यालयात दोन आयएसआय अधिकारी पदाची नियुक्ती आहे. त्यामुळे करण्याचा वाढता कारभार पाहता कामकाजामध्ये फेरबदल करण्यात आले असून, विकास परवानगी विभागातील कामकाजाचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे आता अतिरिक्त आयुक्त म्हणून असलेले दीपक सिंगला यांच्याकडे अधिकार वाढवण्यात आले आहेत. या निर्णयाची तातडीने अंमलबजावणीचे निर्देश देण्यात आले असून, प्रशासकीय कामकाजात गतिमानता होणार आहे.




पीएमआरडीएमधील विकास परवानगी विभागात काही प्रस्ताव आयुक्त यांच्याकडे निर्णयासाठी सादर होत होते. त्यापैकी काही अधिकार त्यांनी अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे हस्तांतरित केले आहेत. कामकाजात गतिमानता येण्यासाठी या बाबतचे प्रस्ताव साहाय्यक महानगर नियोजनकार, रचना साहाय्यक यांनी सह/ उप महानगर नियोजनकार यांच्यामार्फत अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव दाखल करावे लागणार आहे. यामध्ये अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे एक एकरापर्यंतचे भूखंड क्षेत्र असलेले सर्व प्रस्ताव, सर्व वनघर, शेतघर व पेट्रोल पंपाचे प्रस्ताव, सर्व गुंठेवारी प्रकरणे, वास्तुविशारद / अभियंता नोंदणी प्रकरणे, आकाश चिन्ह परवान्याचे प्रस्ताव, वृक्ष प्राधिकरणाशी संबंधित सर्व प्रस्ताव, वरील प्रस्तावासंबंधीची सर्व न्यायालयीन प्रकरणांच्या कामकाजांचा समावेश करण्यात आला आहे. आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडे संबंधित कामकाजाची जबाबदारी सोपवली आहे.

संबंधित कामकाजाव्यतिरिक्त इतर सर्व कामकाज आयुक्त यांच्याकडे निर्णयासाठी येणार आहे. त्यामुळे संबंधित सर्व प्रस्ताव साहाय्यक महानगर नियोजनकार, रचना साहाय्यक यांनी सह / उप महानगर नियोजनकार (विशेष) व संचालक, विकास परवानगी व नियोजन यांच्यामार्फत आयुक्त यांच्याकडे सादर करणे आवश्यक असल्याचा आदेश आयुक्त योगेश म्हसे यांनी दिला आहे. दरम्यान, अतिरिक्त आयुक्तांकडे आता विकास परवानगी विभागाची काही मुख्य जबाबदारी भविष्यात देण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### आकाश चिन्ह विभागाला मिळाला अधिकारी

» प्राधिकरणात आकाश चिन्ह विभाग अस्तित्वात आला तेव्हा या विभागासाठी स्वतंत्र तहसीलदार नेमण्यात आला होता. त्यामुळे या विभागाची कामे जलदगतीने होत होती. मात्र कालांतराने हा स्वतंत्र असलेला विभाग अनधिकृत बांधकाम निर्मूलन या विभागातील प्रमुखांच्या अंतर्गत वर्ग करण्यात आला. त्यामुळे या विभागासाठी काम करण्यात आलेला अधिकारी, कर्मचाऱ्यांना हे काम पाहून पुन्हा अतिक्रमण निर्मूलन विभागातील वेगवेगळी जबाबदारी देण्यात आली होती . त्यामुळे हा विभाग पुन्हा विकास परवानगीकडे आला. त्यानंतर आता अतिरिक्त आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली हा विभाग देण्यात आला आहे.

# येरवडा कारागृहातून आता ‘कोर्ट’चे काम

## खटल्यात ‘तारीख पे तारीख’ होणार कमी : न्यायालयीन कामकाजाला मिळणार गती

**पुणे | प्रतिनिधी**

येरवडा हे राज्यातील सर्वात मोठे कारागृह मानले जाते. कारण येथे कैद्यांची जास्त गर्दी असते. त्यामुळे पोलीस आणि न्याय व्यवस्थेवर प्रचंड ताण पडतो. बंद्यांची विविध कामात ने- आण करण्यात मोठा वेळ जात होता. यावर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी तोडगा काढला असून, कोर्ट कंपनी कारागृहातच कार्यान्वित करण्यात आल्याने ती प्रक्रिया अधिक गतिमान होणार आहे. त्यामुळे खटल्यांची तारीख पे तारीख टळणार आहे.

कारागृहातून बंदीना न्यायालयात, वैद्यकीय कामासाठी तसेच घरगुती अडचणीसाठी पोलीस उपलब्ध नसल्याची कारणे वारंवार दिली जात होती. न्यायालयानेही यावर वारंवार भाष्य करून कारागृह प्रशासनाला पत्रव्यवहार केल्याचे पाहायला मिळाले होते. याच अडचणीवर मात करण्यासाठी आता कोर्ट कंपनी कारागृहातूनच कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे न्यायालयाचा वेळ व बेकायदेशीर गोष्टी टाळण्यास मदत होणार आहे.



### वेळ, खर्चात बचत; ताणही कमी

आत्तापर्यंत ही कोर्ट कंपनी न्यायालयातून कार्यान्वित केली जात होती. त्यांना बंदीवान न्यायालयात हजर करण्यासाठी पोलिस मुख्यालयातील शस्त्रागारातून हत्यारे घ्यावी लागत होती. यामध्ये मोठ्या प्रमाणावर वेळ खर्च व्हायचा. कोर्ट कंपनीकडून मनुष्य बळ उपलब्ध नसल्याचे कारण न्यायालयाला सांगितले जायचे. त्यामुळे तारीख पे तारीखचेही अनुभव यायचे. कारागृहातून एखादा गंभीर रुग्ण ससून रुग्णालयात हजर करायचा झाल्यास सर्व प्रक्रिया पूर्ण करावी लागत होती. त्यातही बराच वेळ खर्च व्हायचा.

कारागृहातील कैद्याचे नातेवाईक मृत पावले किंवा अन्य कारणांसाठी न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांना इच्छित ठिकाणी घेऊन जायचे झाल्यासही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करावी लागत होती. त्यामुळे यामध्ये मोठ्या प्रमाणावर वेळ व्यर्थ होत असल्याचे निदर्शनास आले होते. त्याबरोबरच न्यायालयाबाहेर कैद्यी काढल्यानंतर गैरप्रकारही समोर आले होते. वाटेत नातेवाइकांच्या भेटी-गाठींमुळेही काही महिन्यांपूर्वी गदारोळ झाल्याचेही पाहायला मिळाले होते.

### शस्त्रगृह आणि शंभर जणांची टीम

याच प्रक्रियेला गती देण्यासाठी आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्ट कंपनीला कारागृहातूनच कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याच ठिकाणी त्यांना कैद्याची ने-आण करण्यासाठी छोटेसे शस्त्रगृह उपलब्ध करून देण्यात आले आहे.

तसेच, या ठिकाणी 100 जणांची टीम उपलब्ध असणार असून, त्यांना आलटून पालटून कैदी ने- आण करण्यासाठी ड्युटी लावण्यात येणार आहे. त्यामुळे पुढील दिवशी कोणता कर्मचारी कोणत्या न्यायालयीन बंदीला कारागृहात घेऊन जाणार याबाबतदेखील अचानक तिथल्या तिथे ड्युटी ऑफिसर तसेच पोलिस निरीक्षकाद्वारे निर्णय घेतला जाणार असल्याने गैरप्रकार टाळण्यास यामुळे मदत होणार आहे.

### आजारी कैद्याला मिळणार मदत

» एखाद्या गंभीर कैद्याला व बंद्याला तत्काळ रुग्णालयात हजर करायचे झाल्यास त्यासाठीही तत्काळ निर्णय घेण्यास मदत होणार आहे. बंदीवानांना न्यायालयात हजर केले जात नसल्याच्या तक्रारींनाही या नवीन व्यवस्थेमुळे आळा बसण्यास मदत होणार आहे. कोर्ट कंपनी जरी कारागृहातून कार्यान्वित करण्यात आली असली तरी गंभीर गुन्ह्यातील आरोपींना न्यायालयाच्या आदेशानेच न्यायालयात हजर ठेवण्याचा व व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर राहण्याचा पर्याय उपलब्ध होईल.

### अशी असेल प्रक्रिया

» न्यायालयीन तारखांसाठी कैद्यी न्यायालयात हजर करण्यासाठी न्यायालयाकडून कारागृह प्रशासनाला नोटीस तसेच ई-मेल करून सूचित केले जाते. त्यानुसार न्यायालयातील सुनावणीसाठी बंदीवान कारागृहाबाहेर काढले जात होते. या कोर्ट कंपनीला मुख्यालयातून ड्युटी लावली जात होती. तसेच, सुरक्षेच्या कारणास्तव हत्यारे घेण्यासाठीही वेळ खर्ची जात असल्याचा अनुभव वारंवार आल्याने थेट आता येरवडा कारागृहातूनही ही कोर्ट कंपनी आता काम पाहणार आहे. या नवीन प्रक्रियेमुळे कामात सुसूत्रता येण्यास मदत होणार आहे.

# पुण्यात फळभाज्यांची आवक वाढली!

## शेवगा, कांदा, बटाटा, मटारच्या भावात घसरण : उर्वरित फळभाज्या स्थिर

**पुणे | प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डातील तरकारी विभागात मागील आठवड्याच्या तुलनेत परराज्यासह राज्याच्या विविध भागांतून, परराज्यांतून होणारी फळभाज्यांची आवक वाढली आहे. बाजारात होत असलेल्या मागणीच्या तुलनेत आवक जास्त असल्यामुळे शेवगा आणि कांद्याचे वाढलेले भाव कमी झाले आहेत. याबरोबरच बटाटा आणि मटारच्या भावातही घसरण झाली आहे. मागणी आणि पुरवठा यातील समतोलामुळे उर्वरित फळभाज्यांचे भाव मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहेत.



बाजारात रविवारी (दि. 22) 90 ते 100 ट्रक शेतीमालाची आवक झाली. परराज्यातून झालेल्या आवकमध्ये कर्नाटक, गुजरात आणि आंध्रप्रदेश येथून हिरवी मिरची सुमारे 10 टेम्पो, कर्नाटक आणि गुजरात येथून कोबी 5 टेम्पो, कर्नाटक येथून घेवडा आणि पावटा प्रत्येकी 3 टेम्पो, आंध्रप्रदेश, तमिळनाडू येथून शेवगा 5 टेम्पो, राजस्थान येथून 10 ट्रक गाजर, कर्नाटक येथून 2 टेम्पो भुईमूग शेंग, मध्यप्रदेश येथून सुमारे 20 ट्रक मटार, तामिळनाडू येथून 1 टेम्पो तोतापूरी कैरी, मध्यप्रदेश येथून लसणाची सुमारे 10 टेम्पो आवक झाली होती.

स्थानिक भागातून झालेल्या आवकमध्ये सातारी आले सुमारे 600 गोणी, भेंडी 7 तर गवार, काकडी, कोबी आणि हिरवी मिरची प्रत्येकी 5 टेम्पो, टोमॅटो 10 हजार पेटी, फ्लॉवर, सिमला मिरची आणि तांबडा भोपळा प्रत्येकी 10 टेम्पो, कांदा सुमारे 100 ट्रक, इंदौर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा 40 टेम्पो आवक झाल्याची माहिती ज्येष्ठ आडतदार विलास भुजबळ यांनी दिली.

मार्केट यार्डात पालेभाज्यांची आवक स्थिर आहे. मात्र, पालेभाज्यांना अपेक्षित उठाव नाही. त्यामुळे घाऊक बाजारात कोथिंबिरीच्या भावात जुडीमागे 2 रुपये, शेपू, चाकवत, अंबाडी आणि चवळईच्या भावात जुडीमागे प्रत्येकी 1 रुपयांनी घट झाली आहे. तर कांदापातच्या भावात जुडीमागे 2 रुपयांनी वाढ झाली आहे.